आमच्या लोटे एम. आय डीसी मधील रॅलीज इंडिया कंपनी ही टाटा उद्योग समुहाची एक नामांकीत कंपनी असून या कंपनीनी सामाजीक क्षेत्रातील बांधीलकी या कंपनीने मोठ्या प्रमाणात जपली आहे. रॅलीज इंडिया लिमिटेड कंपनीने आमच्या सोनगाव गावातील (बौध्दवाडी/ब्राम्हणवाडी) मांडवाडी, व मोरेवाडी) या वाड्यांची पाणलोट क्षेत्र प्रकल्पासाठी निवड केली. सुरवातीला पाणलोट क्षेत्र प्रकल्प या बद्दल आमच्या गावातील लोकांना कारशी माहीती नव्हती परंतु रॅलीज इंडिया लिमिटेड कंपनीतर्फे मा श्री अँथोनी (साहेब) मा सौ. जिज्ञासा (मॅडम) यांनी गावातील लोकांना पाणलोट क्षेत्राबद्दल माहीती दिली व या उपक्रमाव्दारे गावाच्या कसा विकास होईल याची जागृता निर्माण केली. सोनगावातील (बौध्दवाडी, ब्राम्हणवाडी, मांडवाडी, मोरेवाडी) नैसर्गिक साधनांचा आपण कशा प्रकारे वापर करून त्याच्या पासून आपल्याला कशा प्रकारे उत्पन्न मिळेल. व ते कशा प्रकारे करता येईल याचे मार्गदर्शन दिले.

कंपनीने सोनगावातील चार वाड्यांचा सर्व्हेक्षण करून विविध प्रकारची शेतकऱ्यांची माहीती तसेच गावातील कुटुंबा-तील उत्पन्न, रोजगार व शैक्षणीक माहीती जमा केली. गावातील तरूण मंडळांनी कंपनीला विशेष सहकार्य करण्याची इच्छा दर्शविली सोनगावाती लोकांना पाणलोट क्षेत्र प्रकल्पाव्दारे त्यांना आधुनिक शेती कशा प्रकारे करता येईल या साठी शेती तज्ञ मार्गदर्शन दापोली कृषी विदयापीठातील अधीकाऱ्याने केले. आमच्या गावातील लोकांना विविध योजना व नैसर्गीक साधने वापरून कशाप्रकारे शेती करता येईल हे प्रत्या-क्षिक दाखविले त्याबरोबर शेती पर्यटन व शेती पर्यटनाच्या दृष्टीने योग्य माहीती व दापोली येथे पर्यटन सहल कंपनीच्या वतीने आयोजीत केली होती.

(1) एस. आर. आय. पध्दत.

२०१५ मध्ये कंपनीच्या वतीने दोन ते तीन वेळा एस. आर आय. पध्दतीबद्दल मार्गदर्शन केले सुरवातीला ~~गावीतील~~ गावातील लोकांच्या मनात आधुनिक भात शेती (एस. आर. आय) बद्दल अनेक गैरसमज होते एस. आर. आय. भात शेती सुरवात कशी करायची जमीनीमध्ये कशा प्रकारे सेंद्रीय खत मिसळून जमीनीचा कस कसा वाढवायचा या सारखे मार्गदर्शन श्री प्रशांत पाटील (एस. आर. आय मार्गदर्शक) व श्री श्रीकांत म्हात्रे साहेब

(पाणलोट मार्गदर्शक) यांनी प्रत्यक्षात पेरणीपासून ते भात कापणी पर्यंत आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन केले. मोठे शेतकरी व छोटे शेतकरी यांना दापोलीतील विविध भात शेती बद्दल माहिती देणारे तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन कृषी तज्ञ इ. अधिकाऱ्यांकडून मिळाले.

(२) पाणलोट प्रकल्प:

पावसाळ्यातील पाणी वाया जावू नये म्हणून छोटे छोटे, बांध बांधून पाण्याचे संवर्धन करून पाण्याची पातळी वाढविणे, तसेच दगड मातीचा (बांध मिश्रीत) करून कच्चा बांध घालणे व लहान सिमेंट बंधारे घालणे व त्याद्वारे मोठ्या प्रमाणात पाणी साठवणूक करणे व साठवलेल्या पाण्याचा शेतीसाठी वापर करणे व जमीन ही बगैर विविध पिकांसाठी वापरणे, कडधान्यासाठी भाजीपाला व इतर पिके.

(३) शाळा:-

आमच्या सोनगांवातील माळवाडीतील जि.प. शाळा मध्ये रॅलीज इंडिया कंपनीचे मोठे सहकार्य लाभले आहे विद्यार्थ्यांसाठी विविध प्रशिक्षण कंपनी मार्फत राबविण्यात येत आहे शाळेतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा (पाणीवाचवा) परसबाग मुलांना आरोग्य विषयी माहिती ७ ते ८ पर्यंत शाळेतील विद्यार्थी हे बौद्धवाडी, माळवाडी, भोईवाडी मधून असून विद्यार्थी दारिद्र रेषेखालील कुटुंबातील मोठ्या प्रमाणात आहेत

(४) शेत जमीन:

रॅलीज इंडीया कंपनीच्या वतीने एस आर आय ही आधुनिक पद्धत शेतीमध्ये वापरलेली असून ६ शेतकऱ्यांनी २०१४ या वर्षात भात शेती ही एस. आर आय पद्धतीने केली म्हणजे भात शेतीतून मिळणारे उत्पन्न हे २५ ते ३५ टक्के पर्यंत वाढले असून शेतकऱ्यांना वेळोवेळी रॅलीज इंडीया मार्फत मार्गदर्शन लाभत आहे शेतकऱ्यांनी व रॅलीज इंडीया टीम ने भात शेती कापुन झाल्यानंतर रिकामी पडणारी शेती यावर उपाय म्हणून या शेतीमध्ये भाजीपाला लागवड करणार शेतकरी निवडून त्यासाठी पाण्याचे व बियाण्यांचे नियोजन केले जात आहे

नदीच्या पात्रात छोटे छोटे बंधारे बांधण्याचे काम आमच्या सोनगांवातील (बौद्धवाडी, माळवाडी, भोईवाडी, ब्राम्हणवाडी) गावांकडून चालू व आम्ही हा प्रकल्प पूर्णपणे यशस्वी करण्यासाठी.

प्रयत्न करत आहेत.

ईकोज कंपनीला या वर्षी 2015 मध्ये आम्ही 2000 झाडांची मागणी केली होती. ती ईकोज इंडिया कंपनीने पूर्णपणे केली असून ही झाडे ~~फळझाडे~~ फळझाडे व इतर उत्पन्न मिळवून देणारी झाडे आहेत

मी. श्री महेंद्र शंकर गमरे (बौद्धवाडी) सोनगावातील ग्रामस्थ असून मला ईकोज इंडिया कंपनी आमच्या गावातील सुधारणांसाठी ज्या प्रकारे मदत करत आहे व आमच्याकडे मुबलक पाणी व मनुष्यबळ आहे परंतु मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ नसल्यामुळे आम्ही काही गोष्टी करू शकलो नाही परंतु आम्हांला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे श्री अँथोनी साहेब व श्री जिज्ञासा मॅडम श्री श्रीकांत म्हात्रे श्री प्रशांत पाटील श्री विवेककुमार जाधव आणि ईकोज इंडीया कंपनीचे इतर सहकारी यांचे मी मनस्वी आभार मानतो व यापूर्वी झालेली कामे व नजीकच्या काळात होणारी कामे यासाठी आमच्या कडून उत्स्फूर्त पणे प्रतिसाद असेल

श्री महेंद्र शंकर गमरे

[signature]